# मी इस्लाम धर्माचा अनुयाय का आहे

लेखक

**हज़रत मिर्ज़ा बशीरुद्दीन महमूद अहमद**

मसीहाचे द्वितीय ख़लीफा (र.जि.)

# मी इस्लाम धर्माचा अनुयायी का आहे

लेखक

**हज़रत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद**

**अपेक्षित मसीहाचे द्वितीय खलीफा**

पुस्तकाचे नावः   मी इस्लाम धर्माचा अनुयायी का आहे
लेखकः   हजरत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद (र.जि)
अनुवादकः   डॉ. बशारत अहमद
टाईपिंग व सेटिंगःखान मामून अहमद एतेज़ाज़
प्रकाशन वर्षः   २०२१
संख्याः   ५००
प्रकाशकः   मुद्रण व प्रकाशन विभाग, कादियान-१४३५१६
जिल्हा गुरदासपूर, (पंजाब)
मुद्रण :   फ़जले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान, भारत.

Name of the book: Why I believe in Islam
Writer: Hazrat Mirza Basheeruddin Mahmood Ahmad
Translator: Dr. Basharat Ahmad
Typing & Setting: Khan Mamoon Ahmed Etyzaz
Edition: 2021
Quantity: 500
Publisher: Nazarat Nashr-o-Isha'at,
Qadian, 143516
Printed at: Fazl-e-Umar Printing Press,
Qadian, Dist. Gurdaspur, (Punjab)
INDIA

# मी इस्लाम धर्माचा अनुयायी का आहे

मला असे विचारले जाते की माझी इस्लाम धर्मावर निष्ठा का आहे? जेव्हा हा प्रश्न मी स्वत:ला विचारतो तेव्हा मला जे उत्तर मिळते, ते असे की, ज्या कारणासाठी मी इतर कोणत्याही गोष्टींवर निष्ठा ठेवतो, म्हणजे कारण ते सत्य आहे. सविस्तर उत्तर द्यायचे झाल्यास माझ्या दृष्टीने सर्वच धर्मांची मध्यवर्ती संकल्पना एकच आहे ती म्हणजे, ईश्वराचे अस्तित्व आणि मानवाचे त्याच्याशी असलेले संबंध म्हणून जो धर्म ईश्वर आणि मानवामध्ये खरेखुरे संबंध प्रस्थापित करण्यामध्ये यशस्वी होवू शकतो तो धर्म खरा धर्म असला पाहिजे आणि कुठल्याही श्रध्देची सत्यता हीच त्यावर निष्ठा ठेवण्यास पर्याप्त कारण असायला हवे. इस्लाम चा असा दावा आहे, की या सृष्टीचा निर्माता एक जीवंत ईश्वर आहे आणि तो स्वत:ला आज देखील आपल्या निर्मित जीवमात्रांवर त्याच प्रकारे प्रकट करतो ज्याप्रकारे तो भुतकाळात युगानयुगे प्रकट करत होता. हा दावा दोन प्रकारे तपासला जावू शकतो. एक तर ईश्वराने स्वत:च आपल्या प्रत्यक्ष संकेतां मार्फत इच्छिुकांवर स्वत:ला प्रकट करावे किंवा इच्छिुकाने त्या व्यक्तिच्या जीवनाचा अभ्यास करून, ज्यावर ईश्वराने स्वत:ला प्रकट केले आहे, ईश्वरावर निष्ठा ठेवावी. ईश्वराच्या कृपेने मी अशां व्यक्तिंपैकी एक आहे, ज्यांच्यावर ईश्वराने अनेक वेळा अलौकीक पध्दतीने स्वत:ला प्रकट केले आहे. म्हणून इस्लाम च्या सत्यतेवर निष्ठा ठेवण्यासाठी मला अन्य कोणत्याही अतिरिक्त कारणाची गरज भासत नाही. कारण मी व्यक्तिश: स्वत: सत्यतेचा अनुभव घेतलेला आहे.

परंतु ज्या व्यक्तिंना अशा प्रकारचा अनुभव व्यक्तिश: आलेला नाही, त्यांच्या लाभासाठी मी माझ्या वैयक्तिक अनुभवाशिवाय अन्य

काहीं कारणे, ज्यांच्या आधारे मी इस्लामवर निष्ठा ठेवतो ते सविस्तर मांडत आहे.

सर्वप्रथम मी इस्लामवर या साठी निष्ठा ठेवतो, कारण तो मला असे सिध्दांत स्वीकार करण्यासाठी फक्त अधिकारवाणीने सक्ती करत नाही तर त्या सिध्दांतांच्या समर्थनात योग्य असे युक्तीवाद देखील मांडतो. ईश्वराचे अस्तित्व आणि त्याच्या गुणवैशिष्टयांचे स्वरूप, देवदूत, प्रार्थना आणि त्यांचे परिणाम, दैवी आदेश आणि त्यांच्या मर्यादा, उपासना आणि त्याची गरज, दैवी विधान आणि त्याचे लाभ, आविष्करण आणि त्याचे महत्त्व, पुनरूत्थान आणि मृत्युपश्चात जीवन, स्वर्ग आणि नरक या सर्व बाबींच्या संदर्भात इस्लामने सविस्तरपणे स्पष्टीकरण दिलेले आहे आणि त्याची सत्यता अतिशय प्रबळ युक्तीवादातून, की ज्यामुळे मानवी बुध्दीचे समाधान होईल, प्रस्थपित केली आहे.

म्हणून इस्लाम मला फक्त श्रध्दाच पुरवत नाही तर माझ्या बौध्दिक समाधानासाठी आणि धर्माची आवश्यकता का आहे, हे समजून घेण्यासाठी निश्चित असे ज्ञान देखील पुरवतो.

दुसरे कारण ज्यामुळे मी इस्लामवर निष्ठा ठेवतो ते हे आहे की, इस्लाम फक्त भुतकाळात होवून गेलेल्या लोकांच्या अनुभवावर स्वत:चा पाया रचत नाही, तर तो प्रत्येकाला जी काही त्याची शिकवण आहे आणि ज्या गोष्टींची तो हमी देतो, त्याचा व्यक्तिश: अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करतो. त्याचा दावा आहे, की प्रत्येक सत्य या जगात कोणत्या ना कोणत्या मार्गाने सिध्द करण्यासाठी जेणे करून माझे परिपूर्ण समाधान होईल, अशा कसोटीवर कस्ता येते.

तिसरे कारण ज्यामुळे मी इस्लामवर श्रध्दा ठेवतो ते हे आहे की, तो मला अशी शिकवण देतो, की ईश्वराच्या उक्ती आणि

कृती मध्ये कुठलीही विसंगती नाही आणि त्या मार्गाने तो विज्ञान आणि धर्म यातील ग्रहीत संघर्षास संपुष्टात आणतो. तो मला निसर्ग नियमांकडे दुलक्षित करण्यासही सांगत नाही आणि ज्या गोष्टी निसर्ग नियमांशी विसंगत आहेत, त्यांवर श्रध्दा ठेवण्यासही सांगत नाही. त्या उलट मी निसर्गनियमांपासून पुरेपुर लाभ उठवावा, त्यासाठी निसर्ग नियमांचा अभ्यास करण्यास तो मला प्रवृत्त करतो. तो मला अशी शिकवण देतो की, आविष्करण ईश्वराकडून होते आणि तोच या सृष्टीचा निर्माता आहे आणि तो जे काही म्हणतो आणि जे काहीं करतो यात कुठल्याही प्रकारचा विसंवाद नाही. तो मला आवाहन करतो, की मी माझ्या बौध्दिक समाधानासाठी त्याच्या आविष्करणाचा अभ्यास करावा, त्याच्या कृतींचा अभ्यास करावा आणि त्या मागील कारणमीमांसा समजून घ्यावी, आणि त्याच्या वचनांचा अभ्यास करावा.

चौथे कारण की ज्यामुळे मी इस्लामवर निष्ठा ठेवतो, की तो माझ्या स्वाभाविक आशा आकांक्षांचे दमन न करता त्यांची योग्य मार्गाने परिपूर्ति करण्यासाठी मार्गदर्शन करतो. तो माझ्या आशा आकांक्षांना पूर्णपणे चिरडून टाकून मला दडपत नाही तसेच त्यांना अनियंत्रित आणि अमर्यादित सोडून मला श्वापद बनवत नाही, तर एखाद्या तज्ज्ञ सिंचन अभियंत्याप्रमाणे, जो अनियंत्रित पाण्याच्या स्त्रोताना नियंत्रित करून, त्याचे सिंचन कालव्यातून वहन करून, की ज्यामुळे जलसंपदेचे अपव्यय होत नाही, माझ्या स्वाभाविक आकांक्षांना योग्य अशा नियंत्रण आणि मार्गदर्शनाद्वारे अत्योच्च नैतिक मूल्यांत परिवर्तित करतो.

तो मला असे म्हणत नाही की, 'ईश्वराने तुला एक प्रेमळ हृदय दिले आहे; परंतु तुझा जीवन साथी निवडण्याची तुला मनाई केली किंवा त्याने मला चव घेण्याची शक्ति प्रदान करून स्वादिष्ट अन्नाचा

आस्वाद घेण्याची क्षमता तर दिली आहे; परंतु असे स्वादिष्ट अन्न सेवन करण्याची मनाई केली आहे; त्या उलट तो मला अशी शिकवण देतो, की योग्य आणि शुध्द पध्दतीने प्रेम करा जेणे करून माझ्या भावी संततीद्वारे माझ्या चांगल्या संकल्पांना शाश्वतता प्राप्त होईल. तो मला स्वादिष्ट अन्न सेवन करण्याची परवानगी तर देतो; परंतु अशा मर्यादेत की जेणे करून असे न व्हावे की मी तर पोटभर खावे आणि माझ्या शेजाऱ्याने उपाशी रहावे. अशा पध्दतीने माझ्या स्वाभाविक आकांक्षांना तो उच्च नैतिक गुणांमध्ये परावर्तित करून माझ्यातील मानवतावादी वृत्तीचे समाधान करतो.

पाचवे कारण ज्यामुळे मी इस्लामवर श्रध्दा ठेवतो ते हे आहे की, तो माझ्याशीच नव्हे तर तो संपूर्ण जगाशी अतिशय योग्य आणि प्रेमळपणे व्यवहार करतो. तो मला अशी शिकवण देतो की, मी फक्त माझ्या प्रतीच माझ्या जबाबदाऱ्या पूर्ण न करता प्रत्येक व्यक्तिशी आणि वस्तूशी मी योग्य व्यवहार करावा असा आग्रह धरतो आणि या कारणासाठी त्याने मला योग्य असे मार्गदर्शन प्रदान केले आहे.

उदाहरणार्थ, तो माझे पालकांच्या अधिकारांकडे आणि मुलांच्या पालकांप्रती असलेल्या कर्तव्यांकडे, लक्ष वेधतो. तो मुलांना उपदेश देतो, की त्यांनी पालकांप्रती आज्ञाधारक असावे आणि त्यांच्याशी सौम्यपणे व्यवहार करावा. तसेच त्याने मुलांना त्यांचे पालक जी काही मालमत्ता सोडतील त्याचे वारस ठरविले आहे. दुसरीकडे त्याने पालकांना आपल्या मुलांचे प्रेम आणि ममतेने संगोपन करून त्यांची योग्य पध्दतीने वाढ होईल अशी दक्षता घेण्यास कर्तव्यबध्द केले आहे. त्यांच्यात योग्य गुण निर्माण होतील, त्यांचे आरोग्य उत्तम राहतील, तसेच त्याने मुलांना आपल्या पालकांचे वारस देखील ठरवले आहे.

त्याचप्रमाणे त्याने पती आणि पत्नी मधील संबंध उत्तम ठेवावेत अशी आज्ञा केली आहे. आणि दोघांनी एकमेकांचे गरजा आणि

आकांक्षाची योग्य काळजी घ्यावी तसेच त्यांनी एकमेकाशी प्रेमळपणे वागावे, अशी आज्ञा केली आहे. या गोष्टीचा ऊहापोह इस्लामचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर (स.) यांनी अतिशय सुंदर पध्दतीने खालील वचनात केला आहे.

ते म्हणतात, ''जी व्यक्ती दिवसात आपल्या पत्नीशी दुर्व्यवहार करतो आणि रात्री तिच्यावर प्रेम करतो त्याचे असे वागणे मानवी स्वभावाच्या सौंदर्याशी पूर्णपणे विसंगत आहे.'' ते असेही म्हणतात की, ''तुमच्यापैकी जे आपल्या पत्नीशी उत्तम व्यवहार करतात तेच सर्वोत्तम आहेत.'' पुढे ते असेही म्हणतात, ''स्त्री ही काचाप्रमाणे नाजूक आहे म्हणून पुरूषांनी त्याच्याशी कोमळपणे आणि नरमाईने वागावे, जसे की ते एखादी काचाची वस्तू हाताळतात.''

इस्लाम ने मुलींच्या शिक्षणांवर आणि प्रशिक्षणावर विशेष भर दिलेला आहे.

पवित्र पैगंबर म्हणतात,''जी व्यक्ती आपल्या मुलीचे योग्य संगोपन करते आणि तिला चांगले शिक्षण, प्रशिक्षण देते ती व्यक्ति स्वर्गाची अधिकारी आहे.''

इस्लाम ने पालकांच्या संपत्तीत मुलांबरोबर मुलींनाही वारसा हक्क दिलेला आहे.

त्याचप्रमाणे त्याने शासक आणि शासित दोघांसाठी योग्य असे नियम आणि कायदे करून मार्गदर्शन केले आहे. तो शासकांना म्हणतो, की त्यांना जे अधिकार प्राप्त झाले आहेत ती त्यांची वैयक्तिक मालमत्ता नाही तर त्यांची भूमिका एका विश्वस्ताप्रमाणे असून त्यांनी विश्वस्ताप्रमाणेच त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. त्यांनी प्रामाणिक आणि नितीमान लोकांप्रमाणे वागून, लोकांशी सल्ला मसलत करून, सरकारी कारभार करावा. तो शासितांना म्हणतो की, परमेश्वराने तुम्हाला तुमचा शासक निवडण्याचा अधिकार प्रदान केला आहे.

म्हणून तुम्ही योग्य व्य व्यक्तींनां, की जे शासन चालवण्यास लायक आहेत, शासक म्हणून निवडावे. आणि एकदा त्याना अधिकारपद दिल्यानंतर तुम्ही त्यांना संपूर्णपणे सहकार्य करावे आणि त्यांच्या विरूध्द विद्रोह करू नये, की ज्यामुळे तुम्ही स्वहस्ते निर्माण केलेल्या वस्तूचा तुम्ही स्वत: विध्वंस केल्याप्रमाणे होईल. त्याने मालक आणि नोकर यांच्या अधिकार आणि कर्तव्यांना योग्यपणे नियमबध्द केले आहे. तो मालकांना असे म्हणतो की, तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना त्यांचा रोजगार, त्यांच्या शरीरावरील घाम शुष्क होण्यापूर्वी, त्यांना देणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन ते आपल्या पेक्षा कमी दर्जाचे आहेत, असा ठेवू नये; कारण ते तुमचे बंधू असून त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी ईश्वराने तुमच्यावर सोपवलेली आहे आणि खऱ्या अर्थाने ते तुमच्या समृध्दीस सहाय्यभूत आहेत. म्हणून तुम्ही मूर्खपणाने त्या गोष्टीचा विध्वंस करू नये, जो तुमच्या शक्तिचा पाया आणि आधार आहे. तो कर्मचाऱ्यांना असे म्हणतो की, जेव्हा तुम्ही एखाद्यासाठी काम करण्यात कार्यरत असता, तेव्हा तुम्ही प्रामाणिकपणे आणि काळजीपूर्वक आपले कर्तव्य पार पाडावे.

तो अशा लोकांना ज्यांना भरपूर शारिरीक शक्ती आणि सामर्थ्य प्रदान करण्यात आले आहे, असे म्हणतो, की त्यांनी दुर्बलांप्रती अत्याचाराने वागू नये आणि जे दुर्दैवाने शारिरीकपणे विकलांग आहेत त्यांच्याशी तुच्छतेने वागू नये, कारण ते त्यांच्या तिरस्कारा ऐवजी दयेस पात्र आहेत.

तो धनवान लोकांना असे म्हणतो की, तुमच्यावर गरीब लोकांची काळजी घेण्याची जबाबदारी टाकलेली असून तुम्ही आपल्या संपत्ती मधून चाळीसावा भाग दरवर्षी बाजूला काढावा, ज्याचा उपयोग गरीबी आणि दु:ख दूर करण्यासाठी आणि वंचितांच्या विकासासाठी

करता यावा. तो त्यांना अशी शिकवण देतो की, त्यांनी वंचितांच्या अभावाचा गैर फायदा घेऊन त्यांना व्याजावर कर्ज देण्याऐवजी त्यांना मोफत अनुदान देऊन आणि बिनव्याजी कर्ज देऊन त्यांची मदत करावी. माणसाला मिळालेले धन यासाठी नाही की त्याने आपले जीवन ऐश्वर्य आणि विलासात जगावे, तर त्याने त्या संपत्तीचा वापर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी करावा, जेणे करून त्याला या जीवनात आणि परलोकातील जीवनात त्याचा योग्य मोबदला मिळेल.

दुसरीकडे तो गरीब लोकांना अशी शिकवण देतो की, तुम्ही दुसऱ्यांच्या संपत्तीकडे लालसेने आणि आसुयेने पाहू नये, की या भावना हळूहळू माणसाच्या मनाला अंधकारात लोटून त्या व्यक्तिला उत्तम गुण, जे त्याला प्रदान करण्यात आले आहेत त्यांचे संर्वधन करण्यापासून वंचित ठेवतो अशा पध्दतीने तो गरीबांना स्वत:मधील असलेल्या क्षमतांचा विकास करण्याकडे प्रवृत्त करून स्वत: स्वाभिमानाने समृध्द होण्याची शिकवण देतो.तो शासकाना निर्देश देतो, की त्यांनी समाजातील गरीब प्रवर्गाच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठी शासकीय संपत्ती आणि अधिकारांचा वापर करावा आणि मोजक्याच लोकांच्या हातात सत्ता आणि संपत्ती संचित होणार नाही, याकडे लक्ष द्यावे.

तो अशा लोकांना ज्यांच्या पूर्वजांनी स्वकर्तृत्वाने मान आणि सम्मान प्राप्त केला होता, आपल्या कर्तव्यांकडे लक्ष देऊन तो मान आणि सम्मान टिकविण्यसाठी आपल्या जबाबदाऱ्या परिपूर्ण कराव्यात, तसेच तो त्यांना अशी ताकीद देतो की, त्यांनी इतरांकडे, ज्यांना अशा प्रकारचा मान सम्मान प्राप्त झाला नव्हता, हीनतेच्या भावनेने पाहू नये. कारण ईश्वराने सर्व मानवांना समान दर्जा दिलेला आहे. तो त्यांचे लक्ष वेधतो की, ईश्वराने ज्यांना आज सम्मान दिला आहे तो इतरांना त्यापेक्षा मोठा सम्मान देवू शकतो आणि जर त्यांनी आपल्या

पदांचा गैरवापर करून, जे वंचित आहेत त्यांच्यावर अन्याय अत्याचार केला, तर भविष्यात स्वत:वर, अशा लोकांकडून जे आज अत्याचार पिडीत आहेत, अत्याचार करून घेण्यासाठी पायाभरणी करत आहेत, असे समजावे. म्हणून त्यांनी आपल्या मोठेपणाचा बडेजाव न करता इतरांना मदत करण्यात अभिमान बाळगावा, कारण खऱ्या अर्थानी महानता त्यानाच प्राप्त होते जे आपल्या पिडीत बांधवांचा उध्दार करण्यासाठी कार्य करतात.

इस्लाम अशी शिकवण देतो की, एका देशाने दुसऱ्या देशावर आक्रमण करू नये. तसेच दुसऱ्या देशानेही अन्य देशांवर आक्रमण करू नये. सर्व राष्ट्रांनी आणि देशांनी एकमेकांशी सहकार्य करून संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी झटत रहावे. तो राष्ट्रांना, राज्यांना आणि व्यक्तिंना एकमेकांशी संधान बांधून दुसऱ्या देशांच्या, राष्ट्रांच्या आणि व्यक्तिंच्या विरूध्द षडयंत्र रचू नये, या उलट तो अशी शिकवण देतो की, राष्ट्रांनी आणि राज्यांनी तसेच व्यक्तिंनी एकमेकाशी करारबध्द होवून, एकमेकांवर आक्रमण केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी आणि जे अविकसीत आहेत त्यांच्या विकासासाठी सहकार्य करावे.

थोडक्यात, मी असे पाहतो, की इस्लाम मला शांती आणि समाधानाने जगण्यासाठी मार्गदर्शन करतो आणि जे कोणी त्यांनी दर्शविलेल्या मार्गाने मार्गक्रमण करण्यास सिध्द होईल, मग ते कोणीही असो, कोठेही असोत, आणि कुठल्याही स्थानावर असोत, सर्वांना शांती आणि समाधानाने जीवन व्यतित करण्यास मार्गदर्शन करतो. म्हणून मला असे वाटते की, इस्लाम माझ्यांसाठी, माझ्या शेजाऱ्यांसाठी, अशा लोकांसाठी ज्यांना मी पाहिले नाही किंवा ज्यांच्याबद्दल मी ऐकले नाही, किंवा पुरूषांसाठी, स्त्रीयांसाठी, वृध्दांसाठी आणि तरूणांसाठी, मालकांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी, धनवानांसाठी आणि गरीबांसाठी,

महाशक्तिसाठी आणि छोटया राष्ट्रांसाठी, आंतरराष्ट्रवाद्यांसाठी आणि राष्ट्रवाद्यांसाठी, सर्वांसाठी इस्लाम समप्रमाणात उपयुक्त आणि लाभदायक आहे. आणि तो माझ्यात आणि माझ्या निर्मात्यात निश्चित आणि दृढ संबंध प्रस्थापित करतो.

मी त्यावर श्रध्दा ठेवतो आणि खरोखरच मी ही श्रध्दा सोडून त्याच्या जागी अन्य एखादी गोष्ट कशी काय स्वीकारू शकतो?